ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १९ पुणें, बुधवार तारीख २४ जून, १९५३ अंक २५

## विविध माहिती

**दांत खराब असण्याचें कारण**—उत्तर प्रदेशांतील शाळकरी मुलांची आहारविषयक आणि आरोग्यविषयक पहाणी राज्यसरकारतर्फे नुकतीच करण्यांत आली असतां असें आढळून आलें कीं, 'अ' जीवनसत्त्वाच्या अभावीं बऱ्याच मुलांचे दांत खराब झालेले आहेत.

**रेल्वे-सर्व्हिसच्या परीक्षा**—भारतीय रेल्वेच्या ट्रॅन्सपोर्टेशन, ट्रॅफिक आणि व्यापारी खात्यांच्या परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांचें वय २५ वर्षें पूर्ण असलेलें आतांपर्यंत चालत होतें. पण रेल्वे बोर्डानें ही वयोमर्यादा २५ वरून २४ पर्यंत कमी केली आहे, असें समजतें.

**पूर्व-युरोपांत जाणाऱ्या रशिअन आगगाड्या**—मॉस्कोपासून पूर्व-युरोपीय देशांच्या राजधान्यांकडे आतां थेट आगगाड्या धावूं लागल्या आहेत. रशिअन रेल्वेचे रूळ युरोपांतील गाड्यांच्या रुळापेक्षा रुंद असल्यानें आतांपर्यंत प्रवाशांना गाड्या बदलाव्या लागत. परंतु आतां सरहद्दीवरील स्टेशनामधून रशिअन डब्यांचे आस व चाकें बदलण्याची सोय करण्यांत आली आहे.

**पाण्याखालील प्राण्यांचा अभ्यास**—रशिअन सागरतज्ज्ञांची एक तुकडी अतिपूर्वेकडील देशांत जाण्यासाठी निघाली आहे. समुद्राच्या तळाशीं असलेले प्राणी, तळाच्या वनस्पती, तळांतील जमीन, इत्यादि बाबींचा अभ्यास ते करणार आहेत. ह्या मोहिमेसाठीं आधुनिक उपकरणांनीं सज्ज अशी एक बोट मुद्दाम तयार करण्यांत आली असून तीमधून हे तज्ज्ञ गेले आहेत.

**आयुर्वेदासंबंधीं संशोधन**—कलकत्ता येथील ऑल इंडिआ आयुर्वेद सेमिनर ह्या संस्थेनें आयुर्वेदीय संशोधन करण्यासाठी एक प्रयोगशाळा स्थापन करण्याचें ठरविलें आहे. कलकत्ता येथील एका औषधाच्या कारखान्यानें संशोधन-केंद्र उघडण्यासाठी मदत म्हणून ५०,००० रुपये देण्याचें कबूल केलें आहे.

**आयुर्वेदीय ग्रंथकारांना बक्षिसें**—उत्तर-प्रदेशांतील आयुर्वेदिक अँड टिब्बी अॅकॅडमीनें ह्या विषयावरील मान्य पुस्तकांना बक्षिसें देण्याचें ठरविलें आहे. पुस्तकें इंग्लिश, हिंदी, संस्कृत आणि उर्दू भाषांमधून लिहिलेलीं चालतील. आयुर्वेद आणि टिब्बी औषधविषयक प्राचीन हस्तलिखितें विकत घेण्याची व्यवस्थाहि संस्थेनें केली आहे.

**कॉरोनेशन संबंधींचे रेकॉर्ड्स्**—राणी एलिझाबेथ हिच्या राज्यारोहणप्रसंगीं जो समारंभ साजरा करण्यांत आला तो सर्व १२ इंचांच्या रेकॉर्डसवर एका ब्रिटिश कंपनीनें ग्रथित केला आहे. फक्त धार्मिक विधांसंबंधींच्या तीन स्वतंत्र रेकॉर्डसहि तयार करण्यांत आल्या आहेत. याशिवाय राणीचें भाषण आणि वृत्तनिवेदकांचीं भाष्यें ह्यांचींहि रेकॉर्डस घेण्यांत आलीं आहेत.

**प्लॅस्टिकच्या प्रचंड वस्तू**—प्लॅस्टिकच्या वस्तू तयार करणारे ब्रिटिश कारखानदार आतां मोठमोठ्या वस्तू तयार करूं लागले आहेत. ह्या धंद्यासंबंधीं भरविण्यांत आलेल्या एका प्रदर्शनांत ग्लायडरचा एक पंख ठेवण्यांत आला होता. त्याची लांबी ३० फूट होती आणि वजन १५५ पौंड होतें.

**रशिआंत राज्यारोहणाचा चित्रपट**—ब्रिटिश आणि रशिअन चित्रपटांची देवघेव करण्याच्या कराराप्रमाणें राणी एलिझाबेथ हिच्या राज्यारोहणसमारंभाचा चित्रपट रशिआंतील सिनेमागृहांत दाखविण्यांत येणार आहे असें समजतें.

**करमणुकीवरील कर भरला नाहीं**—मध्यप्रदेश राज्यांतील चार सिनेमा-थिएटरांच्या मालकांनीं करमणुकीवरील कर भरला नसल्यामुळें तीं सरकारनें बंद केलीं आहेत. कराची थकलेली बाकी सुमारें ८०,००० रुपये आहे असें समजतें.

**मयुराक्षी धरणाचें काम**—प. बंगालमध्यें मयुराक्षी नदीवर बांधण्यांत येणाऱ्या सर्वांत मोठ्या धरणाचें काम पुढील वर्षी संपेल असा अंदाज करण्यांत आला आहे. धरण पुरें झाल्यावर प. बंगालमधील ६,००,००० एकर जमिनीला निश्चित पाणीपुरवठा होऊन ३,००,००० टन भात आणि ५०,००० टन इतर धान्यें अधिक पिकूं लागतील.

**बंगलोर येथें रेडिओचा कारखाना**—बंगलोर येथें रेडिओचें साहित्य तयार करण्याचा एक कारखाना १९५६ अखेर प्रत्यक्ष उत्पादन करूं लागेल. कारखान्याला लागणारें भांडवल भारतीय सरकार पुरविणार असून त्याचें नांव भारत इलेक्ट्रॉनिक्स इंडस्ट्री असें ठेवण्यांत येणार आहे. कारखान्यांत काम करणाऱ्या तंत्रज्ञांना शिक्षणासाठीं सध्या युरोपमधील कारखान्यांतून काम शिकण्यास पाठविलें आहे.

**ब्रिटनमध्यें आंब्याला वाढती मागणी**—मुंबईहून इंग्लंडला आंब्यांचीं पार्सलें आतां नियमितपणें जाऊं लागलीं आहेत. ब्रिटनमध्यें हापूस आंब्यांना विशेष मागणी असून पहिल्या कांहीं पार्सलामधील फळें प्रत्येकीं ४ रुपयांना तावडतोब विकलीं गेलीं. लंडनमधील पिकॅडेली भागांत वाण्याउदम्यांचीं जीं अद्यावत् दुकानें आहेत त्यांमधून आंबे विकण्यासाठीं ठेवण्यांत येतात.

**चीनचें लोखंडाचें उत्पादन**—१९५० मध्यें चीनमधील लोखंडाच्या कारखान्यांनीं जितकें लोखंड तयार केलें त्याच्या दुप्पट १९५२ सालीं निर्माण केलें. चीनमधील लोखंड गाळण्याच्या भट्ट्यांमधून आतां उत्तम प्रतीचें बिडाचें लोखंड तयार होऊं लागलें आहे.

## गिरण्यांच्या धंद्यांतील स्थित्यंतर

### उत्पादन वाढूनहि फलप्राप्ति कमी

श्री. संपादक, अर्थ, पुणें

यांसी नमस्कार विशेष

आपले अर्थाचें ता. २७-५-५३ चे अंकांत, आपण "कांहीं गिरण्यांचें उत्पादन" या मथळ्याखालीं कांहीं गिरण्यांचे १९५१ व ५२ सालचे आकडे दिले आहेत. माझ्या मतें हे आकडे उत्पादनाचे नसून त्या त्या सालचे सेलस्-विक्रीचे-आहेत. आपण ही दुरुस्ती करावी.

मी "टाटा मिल" व "कोहिनूर मिल" या दोन गिरण्यांचे ताळेबंद पाहिले, त्यांत खालील माहिती आहे—

टाटा मिल

| | १९५२ | १९५१ |
|---|---|---|
| क्लॉथ अकाऊंट वर्षांतील विक्री | २,६७,२९,५२८ | ३,१३,७१,५५९ |
| यार्न अकाऊंट " " | ७८,९३९ | १,१६,९४० |
| वेस्ट अकाऊंट " " | ६,२४,२५५ | ७,६८,२९५ |
| एकूण | २,७४,३२,७२२ | ३,२२,५६,७९४ |
| आपण छापलें | २७४ लक्ष | ३२२ लक्ष |

कोहिनूर मिल

| | | |
|---|---|---|
| क्लॉथ यार्न वेस्ट सेलस् | ७,०९,४३,५७६ | ७,८६,८५,३०९ |
| आपण छापलें | ७०९ लक्ष | ७८७ लक्ष |

यावरून आपणांस दिसून येईल कीं हे आकडे उत्पादनाचे नसून विक्रीचे आहेत. शिवाय आकडे रुपयांत आहेत. १९५२ चे मार्च-एप्रिलमध्यें जी मंदी आली त्यामुळें कापडाचे भाव उतरले व गिरण्यांना विक्रींत कमी उत्पन्न आलें. रुपयांत १९५२ मध्यें १९५१ पेक्षा उत्पन्न कमी आलें हें वर दाखविलें. पण पौंडांत (सुताचें) व वारांमध्यें (कापडाचें) उत्पादन १९५१ पेक्षा १९५२ मध्यें जास्तच झालें असें मुंबईचे "कॉमर्स्" वरून दिसून येईल.

१९५१ मध्य ४१८८० लक्ष वार कापड निघालें व १९५२ मध्यें ४६६४० लक्ष वार कापड निघालें. म्हणजे ४७६० लक्ष वार जास्त. त्याचप्रमाणें १९५१ मध्यें १२९५० लक्ष पौंड सूत निघालें, तर १९५२ मध्यें १४२३० लक्ष पौंड सूत निघालें. म्हणजे, १२८० लक्ष पौंड जास्त.

१९५२-५३ मध्यें पुष्कळसे कंट्रोल उठविले गेले. त्यामुळें व एकंदर मागणी कमी असल्यामुळें, बाजारांत स्पर्धा सुरू झाली व "गिऱ्हाईकी बाजार" प्रस्थापित झाला. ज्या गिरण्यांचा माल चांगला व टिकाऊ नव्हता त्यांना चांगल्या गिरण्यांपेक्षा भाव कमी आले व "साठे" वाढू लागले. "भविष्य" काय सांगणार?

मुंबई, २४ }
ता. १८-६-५३ }

आपला
ग. कृ. चितळे

**पोलंड-भारत व्यापारी करार**—भारत आणि पोलंड ह्यांच्या दरम्यान जानेवारी १९५१ मध्यें एक व्यापारी करार करण्यांत आला होता. ह्या कराराची मुदत ३१ जानेवारी, १९५४ पर्यंत वाढविण्यांत आली असल्याचें वॉर्सा रेडिओवरून सांगण्यांत आलें.

## विविध विकास-योजना आणि भारत व अमेरिका यांचा खर्च

भारत सरकारच्या नियोजन मंडळानें १५ विविध क्षेत्रांत विकास-योजना सुरू केल्या आहेत. या योजनांसाठीं भारत आणि अमेरिका यांनीं पैसा पुरविला आहे. अमेरिकेनें ८,८३,५०,००० डॉलर (सुमारें ४२ कोटि, २३ लक्ष रुपये) आणि भारतानें ७१ कोटि, ७५ लक्ष रुपये खर्च केले आहेत. याचा तपशील खालील तक्त्यांत दाखविला आहे.

| विकास योजना | अमेरिकन साहाय्य (डॉलरमध्यें) | भारताचा खर्च (रुपयांमध्यें) |
|---|---|---|
| १. खतांचा पुरवठा (१,८६,००० टन) | १,५०,४०,९२७ | ७१,०६,००० |
| २. लोखंड-पोलाद पुरवठा (१,१०,००० टन) | १,६८,८५,००० | ४,४३६,४७० |
| ३. टोळांचा प्रतिबंध व पीक संरक्षण | ४,५१,००० | ७,४८,००० |
| ४. जमिनीचें संशोधन व खतांचा वापर | २,००,००० | ८,४२,५४० |
| ५. मच्छिमारीचा विकास | २४,६२,००० | ९८,९५,००० |
| ६. भूगर्भजल-पुरवठा (२,६५० नलिका विहिरी) | २,१५,००,००० | ९,१५,००,००० |
| ७. ग्रामसेवकांचें शिक्षण | २,९९,२०० | ७६,१०,५०० |
| ८. ग्रामविकास योजना | १,०५,९६,००० | ४१,७१,३४,००० |
| ९. हिंवताप प्रतिबंध | ५८,४८,००० | १,४९,३७,३५० |
| १०. जंगल संशोधन व वाळवंटांवर नियंत्रण | १,०४,००० | २,०८,००० |
| ११. खोरीं योजना | १,०१,८८,८७३ | १५,३३,००,००० |
| १२. भूगर्भजल पहाणी | ४५,००,००० | १,२०,००,००० |
| १३. इमारत बांधकाम संशोधन | १,००,००० | १,००,००० |
| १४. कमी किंमतींचीं घरें | ७५,००० | १,५०,००० |
| १५. मध्यवर्ती मजूर संस्था | १,००,००० | ५,००,००० |
| | ८,८३,५०,००० डॉलर | ७१,७४,६७,८६० रुपये |

याशिवाय सिन्द्रीखत कारखाना, दामोदर खोरें कॉर्पोरेशन, भारत सरकारच्या विनंतीनुसार आणलेल्या तंत्रज्ञांचे पगार, भारतीय तंत्रज्ञांचें परदेशी शिक्षण आणि कारभाराचा खर्च यासाठी आणखी ९८,०८,८८८ डॉलर खर्च करण्यांत आले आहेत.

# अर्थ

बुधवार, ता. २५ जून, १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद् वामन काळे


## सहकारी दृष्ट्या मागासलेल्या राज्यांत चळवळीच्या प्रगतीस रिझर्व्ह बँकेची चालना

वेगवेगळ्या राज्यांतून सहकारी बँकिंगची व कर्जपुरवठ्याची व्यवस्था निर्माण करण्याचे बाबतींत रिझर्व्ह बँकेकडे दोन दृष्टींनीं बघतां येईल. देशाची मध्यवर्ती बँक, ह्या दृष्टीनें कर्जपुरवठ्याची संघटित व्यवस्था घडवून आणण्याकडे तिला लक्ष पुरविलेंच पाहिजे आणि त्या व्यवस्थेंत ग्रामीण विभागांच्या गरजांस महत्त्व देण्याचें अगत्य निर्विवाद आहे. ग्रामीण विभागांस कर्जपुरवठा करण्याची संघटना म्हणजे सहकारी चळवळ ही होय. ती आज पुरेशी समर्थ नसली तरी पुढें होऊं शकेल. ह्या चळवळीची भारतांतील प्रगति सर्व राज्यांत समान झालेली नाहीं, आणि कित्येक राज्यांत ती अगदी सामर्थ्यहीन असून पुनरुज्जीवनाची वाट पहात आहे. कांहीं राज्यांतील पतपेढ्यांच्या शेतकरी–सभासदांना अजूनहि भारी दरानें व्याज द्यावें लागतें. सहकारी चळवळीचा विकास योग्य प्रकारें झाला, तर मद्रास व मुंबई येथल्या प्रमाणें अल्प व्याजाच्या दरानें त्यांना कर्जें मिळूं शकतील. दुसरी बाजू म्हणजे, सध्याच्या असमान प्रगतीमुळें, रिझर्व्ह बँक राज्य सहकारी बँकांना पीक कर्जासाठी जीं अल्प मुदतीचीं कर्जें देते, त्यांचीहि वाटणी विषम होते. उदाहरणार्थ, राज्य सहकारी बँकांना रिझर्व्ह बँकेनें १९५१–५२ मध्यें १२·५ कोटी रु. कर्जाऊ दिले, त्यांपैकी मद्रासच्या वाट्यास ४·५ कोटी रु. व मुंबईच्या वाट्यास ६ कोटी रु. आले. उलट, जेथें सहकारी चळवळीची प्रगति नीट झालेली नाहीं, तेथें रिझर्व्ह बँकेच्या मदतीची गरज ज्यास्त असूनहि अनेक कारणांमुळें ती मदत मिळूं शकत नाहीं. रिझर्व्ह बँक राज्य सहकारी बँकांमार्फतच कर्ज देतें, परंतु अशा बँकाच अस्तित्वांत आलेल्या नसतात किंवा त्या अगदी निकृष्टावस्थेंत असतात. सेंट्रल को. बँकांची मजबुती पुरेशी नसते आणि प्राथमिक पतपेढ्याहि कर्जास पात्र नसतात. ज्या राज्यांत सहकारी चळवळीची प्रगति ज्यास्त झालेली आहे, अशा ठिकाणींच रिझर्व्ह बँकेचीं कर्जें केंद्रित होऊं नयेत, ह्यासाठी रिझर्व्ह बँक इतर ठिकाणच्या राज्य सहकारी बँकांनाहि १७ (४) (अ) कलमाखालीं सरकारी हमीच्या आधारावर कर्ज देते. अर्थात्, ही व्यवस्था तात्कालिक स्वरूपाची आहे; कायमची सोय नव्हे. सरकारी हमीचा उपाय केवळ मार्ग काढण्यासाठी व चालना देण्यासाठी आहे; सहकारी दृष्ट्या मागासलेल्या राज्यांनीं इतर प्रगत राज्यांच्या बरोबरीस येऊन, तेथील सहकारी संस्थांनीं स्वतःच्या मजबुतीचे आधारावर रिझर्व्ह बँकेच्या मदतीस लायक होणें, हाच ह्या परिस्थितीवर खरा उपाय आहे.

वरील गोष्टी लक्षांत घेतल्या, म्हणजे रिझर्व्ह बँकेचें ॲग्रिकल्चरल क्रेडिट खातें सहकारी दृष्ट्या मागासलेल्या राज्यांशीं विचारविनिमय करून तेथें सहकारी चळवळीची वाढ करवून आणण्यासाठी एवढी उत्सुक कां आहे, हें सहज ध्यानांत येईल. ह्या खात्याच्या अधिकाऱ्यांनीं अशा राज्यांत प्रत्यक्ष जागेवर जाऊन पहाणी करावयाची, तेथील सरकारी व बिन-सरकारी कार्यकर्त्यांशीं चर्चा करावयाची, त्यांनीं मुंबईच्या कचेरीकडे आपला अहवाल पाठवावयाचा, कचेरीनें त्या अहवालावर हात फिरवावयाचा, त्याची प्रत ज्या त्या राज्याच्या योग्य त्या अधिकाऱ्याकडे पाठवावयाची, त्यांच्याकडून अहवालावर मत आल्यावर रिझर्व्ह बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं त्या त्या राज्यांत जाऊन समक्ष चर्चा करावयाची, त्या सर्वांचा निष्कर्ष काढून प्रत्येक राज्याकरितां सहकारी प्रगतीची एक योजना तयार करावयाची, आणि ह्या योजनेप्रमाणें प्रत्यक्ष कार्य होतें किंवा नाहीं हें पहाण्यासाठी देखरेख करावयाची, असा रिझर्व्ह बँकेनें जून, १९५१ पासून उपक्रम केला. 'अ' वर्गांतील सर्व राज्यें, 'ब' वर्गांतील जम्मू आणि काश्मीर वगळून सर्व राज्यें व 'क' वर्गांतील सर्व राज्यें ह्यांच्या बाबत हा कार्यक्रम पुरा झाला आहे. कित्येक राज्यांतून प्रत्यक्ष कामास प्रारंभहि झाला आहे.

---

## कलकत्ता शहरांतील अपघातांचें अल्प प्रमाण

कलकत्ता शहराची लोकवस्ती मुंबईपेक्षा अधिक आहे. त्याचप्रमाणें त्या शहरांत वावरणाऱ्या बसेस, ट्रॅम्स आणि रिक्षा ह्यांची संख्याहि मुंबई शहराच्या मानानें अधिक आहे. तरीसुद्धां कलकत्त्यांतील रस्त्यांत झालेल्या अपघातांची संख्या गेल्या वर्षी बरीच कमी झाल्याचें दिसून येतें. अर्थात् अपघातांत मेलेल्यांची संख्याहि कमी झाली आहे. १९४७ सालीं कलकत्त्यांत रस्त्यावर झालेल्या अपघातांत १८४ नागरिक बळी पडले होते. १९५२ सालीं अशा अपघातांत दगावलेल्यांची संख्या अवघी ८४ आहे. अपघाताच्या संख्येंत झालेली ही घट आपोआप झाली आहे असें म्हणतां येणार नाहीं. कारण १९४७ पासून ओळीनें पांच वर्षें ती कमी कमी होत चाललेली दिसून येते. कलकत्त्यांत रहदारीवर नियंत्रण ठेवणाऱ्या पोलिसांची संख्या मुंबईच्या मानानें अधिक आहे असें मुंबईच्या पोलिसांचें म्हणणें आहे. मुंबईमधील अपघातांच्या संख्येंतहि घट होत आहे असा त्यांचा दावा आहे आणि तो कांहींसा खराहि आहे. पण ह्यासंबंधीं एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे ती ही कीं, पांच वर्षांपूर्वी मुंबई शहर अपघातांच्या बाबतींत जगांतील दुसऱ्या अनुक्रमाचें शहर म्हणून प्रसिद्ध होतें. शहरांत धांवणाऱ्या मोटारी आणि अपघात ह्यांच्या आधारावर वरील गणित करण्यांत आलें होतें. त्या मानानें मुंबईत झालेली सुधारणा अजून पुरेशी वाटत नाहीं. १९४९ सालीं मुंबईत २६५ ट्रॅम्स आणि ४०० बसेस होत्या. त्यासालीं मुंबईत २२० अपघाती मृत्यू झाले. त्याच सालीं कलकत्त्यांत ४२२ ट्रॅम्स आणि १,००० बसेस असतांना अवघे १११ अपघाती मृत्यू झाले. शिवाय कलकत्त्यांत ५,००० रिक्षा आहेत त्या वेगळ्याच. मुंबईतील अपघातांचा सर्वच दोष रहदारीचें नियंत्रण करणाऱ्या पोलिसांवरच येतो असें नाहीं. पण ह्या बाबतींत सुधारणेला अजूनहि जागा आहे, एवढेंच.

## मध्यप्रदेशांत अल्युमिनमच्या मातीच्या खाणी

भारतांत सांपडूं शकणाऱ्या खनिजांचा शोध जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिआ ही सरकारी संघटना करीत असते. ह्या संघटनेला नुकताच असा शोध लागला आहे कीं विंध्यप्रदेशाच्या आणि मध्यप्रदेशाच्या सरहद्दीवर असणाऱ्या अमरकंटक भागांत अल्युमिनम असणारी माती आहे. ह्या मातीला बॉक्साइट असें नांव असून वरील भागांत ती ५,००,००० टनापर्यंत सांपडू शकेल असा अंदाज करण्यांत आला आहे. अल्युमिनमचा धंदा स्थापन करण्याला व वाढविण्याला हा भाग विशेष अनुकूल आहे असें समजतें. भारतामध्यें बॉक्साइट मातीचे जे साठे आहेत त्यांत हा साठा महत्त्वाचा तर आहेच. पण खाणी सोडून प्रत्यक्ष अल्युमिनम तयार करण्यासाठी ज्या ज्या बाबी अनुकूल पाहिजेत त्या त्या सर्व येथें आहेत. एकतर मातीचे थर विखुरलेले नसून सरळ रेषेंत सांपडण्यासारखे आहेत. पेंद्रा रोड स्टेशनपासून ८ ते २० मैल अंतरापर्यंत हे थर सांपडतील असा अंदाज व्यक्त करण्यांत येत आहे. एकेका ठिकाणीं सांपडणारी माती बेताचीच असती तर खालीं खोदणें किफायतशीर होत नाहीं. कांहीं किमान चनफूट माती सांपडेल तरच खाणी खोदणें हितकारक ठरतें. सुदैवानें ह्या भागांतील बॉक्साइटचे साठे बऱ्याच मोठ्या प्रमाणावर असल्यानें अल्युमिनमचे कारखाने साठ्याच्या जागेवरच काढता येण्यासारखे आहेत. असें कारखाने काढल्यास ते वरींच वर्षें चालतील. सर्व साठे मिळून अवघ्या १५ चौरस मैल क्षेत्रांत सामावलेले आहेत. पूर्वीच्या रेवा संस्थानाचा द. भाग येथून फारसा लांब नाहीं. रेव्यांत सांपडणाऱ्या कोळशाचा उपयोग करून अल्युमिनमच्या कारखान्यांना लागणारा विजेचा पुरवठाहि निर्माण करतां येण्यासारखा आहे.

## रशिअन अर्थव्यवस्थेसंबंधी प्रबंध

अमेरिकेंतील कोलंबिआ विद्यापीठानें १९३७ सालामधील सोव्हिएट रशिआचें उत्पादन आणि उत्पन्न ह्या शीर्षकाखालीं एक प्रबंध नुकताच प्रसिद्ध केला आहे. राष्ट्रीय उत्पन्नाचें पृथःकरण करणाऱ्या ज्या प्रगत अमेरिकन पद्धती आहेत त्या रशिअन अर्थव्यवस्थेला लावून पहाण्याचा हा पहिलाच प्रयत्न आहे असें सांगण्यांत येत आहे. १९३७ सालच निवडण्याचें कारण असें कीं, त्या सालामधील तपशीलवार आंकड्यांसहित माहिती उपलब्ध आहे. हारवर्ड विद्यापीठांतील अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणतात कीं ह्या प्रबंधामुळें रशिअन अर्थव्यवस्थेसंबंधीं नवी माहिती मिळाली असून ती तपशीलवार आहे. प्रबंधाचा मुख्य हेतु रशिआचें राष्ट्रीय उत्पन्न अजमावण्याचा आहे. त्यासाठी जरूर ती अनुषंगिक माहितीहि प्रबंधांत ग्रथित करण्यांत आली आहे. पैशाचा पुरवठा, सर्वसाधारण द्रव्यविषयक पद्धत, आर्थिक व्यवहार, वस्तूंचें आणि सुखसोयींचें वितरण, इत्यादि बाबींसंबंधींहि प्रबंधांत चर्चा केलेली आहे. प्रबंधकार मि. बर्गसॉ म्हणतात कीं रशिआनें आपली अर्थव्यवस्था पंचवार्षिक कार्यक्रम पार पाडून विकसित केली. हे कार्यक्रम पार पाडतांना राष्ट्रीय उत्पन्नाचा फार मोठा भाग भांडवली खर्च म्हणून करण्यांत आला. रशिआनें आपली मूलभूत आर्थिक शक्ति वाढविण्याकडेच मुख्यतः भांडवल खर्चीं घातलें. त्यामुळें रशिआचा औद्योगिक प्रगतीचा वेग प. युरोपिय राष्ट्रांच्या मानानें बराच अधिक होता ह्यांत शंका नाहीं. पण त्यामुळें रशिअन नागरिकांना फार त्याग करावा लागला. १९३७ सालीं फक्त ५६ टक्के राष्ट्रीय उत्पन्न त्यांना उपभोगासाठी मिळालें.


## लोकांच्या श्रम–सहकार्याचें एक नमुनेदार उदाहरण

(भा. म. का.)

पंचवार्षिक योजनेचा, विशेषतः ग्रामीण जीवनाच्या बाबतींतला कार्यक्रम हा लोकांच्या सहकार्यावर व मोफत दिलेल्या श्रमांवर अवलंबून आहे. यंदां महाराष्ट्रांत पुष्कळ ठिकाणीं पाण्याची टंचाई तीव्रतेनें जाणवली. या बाबतींत लोकांनीं सहकार्यानें केलेल्या श्रमांमुळें कुलाबा जिल्ह्यांतील आवास या गांवांत पाणीपुरवठ्याचा प्रश्न अल्प प्रमाणांत कसा सोडविला गेला याचा अनुभव मे महिन्यांत नुकताच आला. गांवांत एक मोठें तळें आहे व त्याचें पाणी गांवांतील कांहीं शेतकरी लोक वापरतात. अलिकडे दर वर्षीं कमी होत जाणाऱ्या पावसाच्या प्रमाणामुळें या तळ्यांतील पाणी लोकांना पाऊस सुरू होईपर्यंत पुरत नाहीं. १९५२ च्या मे महिन्यांत आदल्या वर्षीं पाऊस सरासरीहून निम्मेपेक्षा कमी पडल्यामुळें पाण्याची टंचाई तीव्रतेनें जाणवली. त्यावेळीं गांवांतील लोकांनीं वर्गणी जमवून व कांहींनीं फुकट काम करून तळें एका बाजूला थोडें खोल केलें व त्याचा तात्पुरता उपयोग झाला. यंदां या तळ्याच्या बाजूला विहीर खणण्यासाठी सरकारनें ३ हजार रु. मंजूर केले. परंतु तेवढ्या खर्चांत खोल विहीर खणून ती बांधण्याचें काम होऊं शकणार नाहीं म्हणून कांहीं गांवकऱ्यांनीं विनामूल्य काम करून विहीर बांधून पुरी केली. ग्रामस्थांचे हे श्रम पैशाच्या रूपानें निदान एक हजार रु. किंमतीचे होतील. या नवीन विहिरीमुळें सुमारें २० कुटुंबांची पाण्याची सोय होणार आहे. अशा प्रकारें लोकांनीं श्रम देऊन सहकार्य केल्यास ग्रामीण विकासयोजनांचा कार्यक्रम यशस्वी होऊं शकेल.


दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

मजबूत सेफ डिपॉझिट व्हॉल्टसमध्यें



★ आपणांकरितां लॉकर आजच राखून ठेवा.

★ माफक भाड्यांत सोय व सुरक्षितता.

★ आपल्या विशिष्ट गरजा कळवा. त्यांचा अगत्य विचार करूं.

थोरले बाजीराव रस्ता
पुणें २.

चिं. वि. जोग,
मॅनेजर.

## ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड, ओगलेवाडी
### ३१-१२-५२ अखेरच्या वर्षाचा आढावा

अनेक आपत्ति व अडचणीमुळें १९५२ सालीं घसाऱ्याची तजवीज न करतां कंपनीस रु. २,७८,४७१-१२-९ इतकें नुकसान सोसावें लागलें. कोळशाच्या टंचाईमुळें अहवालाचे सालीं कांच कारखान्याकडील दोन्ही भट्ट्या वर्षभर चालू शकल्या नाहींत. सुमारें ६ महिने फक्त एकच भट्टी चालू राहिली. एनॅमल विभागांतहि सदर मुदतींत त्याच कारणामुळें एक भट्टी बंद करावी लागली व कांहीं महत्त्वाच्या ऑर्डर्स पुऱ्या करण्यासाठी खर्चाचे दृष्टीनें महाग पडत असतांहि, दुसरी भट्टी तेलावर चालू ठेवावी लागली. सन १९५२ मार्च पासून मंदीची लाट येऊन सर्वच बाजारभाव घसरले व या घसरगुंडीचा परिणाम कंदिलाच्या मागणीवर इतका झाला कीं, नुकसानींत आणखी भर घालण्यापेक्षां कंदिलाचें उत्पादनच कमी करणें भाग पडलें. या सर्व परिस्थितीचा एकंदर उत्पादनावर अनिष्ट परिणाम होऊन त्यांत रु. ४,००,०००/- पेक्षा अधिक घट आली. उत्पादनाप्रीत्यर्थ कराव्या लागणाऱ्या व इतर वरकड खर्चांत मात्र तितक्या प्रमाणांत बचत होऊं शकली नाहीं. उलटपक्षीं त्यांत रु. १,२०,०००/- पेक्षाहि जास्त वाढ झाली.

नुकसानीचें महत्त्वाचें कारण म्हणजे कंपनी तयार करीत असलेल्या मालाचे दर-दामांत अनपेक्षित मंदीमुळें आलेली घट हें होय. कच्चा माल, मजुरी व अन्य खर्चांचेंचौत काटकसर करणेस फारसा अवसर नाहीं. अशा परिस्थितींत धंदा फायदेशीर होण्यास एकच मार्ग म्हणजे कामगारसंख्या व वरकड खर्चांत वाढ न करतां सध्याचें उत्पादन भरपूर प्रमाणांत वाढविणें एवढाच आहे व ही गोष्ट नजरेसमोर ठेवून तजवीजी गेल्या वर्षापासूनच कंपनीनें चालूं केल्या आहेत.

अहवालाचे सालीं इंडस्ट्रिअल फायनान्स कॉर्पोरेशनकडून मंजूर झालेल्या कर्जाचे रकमेपैकीं रुपये दहा लक्ष घेतले असून सदर रकमेंतून कंदील कारखान्याकडील जुन्या झालेल्या यंत्रांचे जागीं नवीं यंत्रें बसवून सदर खात्याची पुनर्रचना बहुतेक पूर्ण झाली आहे. कांचकारखान्याकडील कांचेचा अखंड पुरवठा करणारी टँक फर्नेस व खर्चांत बचत करून मालाचा टिकाऊपणा वाढविणारी अद्यावत् सुधारलेली अनीलिंग लेहरची उभारणी चालू आहे. एनॅमल खात्याकडील फिरते स्मेल्टर्स व सुधारलेल्या मफल फर्नेसिस बांधण्याचें कामहि हातीं घेतलें आहे. हीं सर्व कामें चालू वर्षाअखेर पुरी होऊन या सर्वांचें फळ १९५४ सालीं पदरांत पडेल अशी डायरेक्टर्सना उमेद आहे. कंपनीची वार्षिक सभा ५ जुलै, १९५३ रोजीं आहे.

---

जपानची वाढती लोकसंख्या—अमेरिकन मानववंश शास्त्रज्ञ व सामाजिक संशोधक डॉ. हर्बर्ट पासिन ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे, कीं जपानपुढील सर्वांत मोठा प्रश्न वाढत्या लोकसंख्येचा आहे. जपानमध्यें शेतीला योग्य अशी जमीन आतां फारशी नसल्यानें शेतीचा विकास करण्यास जागा नाहीं. जपान त्याला लागणाऱ्या अन्नापैकीं ८० टक्के अन्न निर्माण करतो; पण बाकीचें त्याला आयात करावें लागतें, अशीहि माहिती त्यांनीं सांगितली.

लंडनमध्यें पुराणवस्तूंचें प्रदर्शन—लंडनमधील पुराणवस्तु विक्रेत्यांनीं प्राचीन कलावस्तूंचें एक प्रदर्शन भरविलें आहे. ह्या प्रदर्शनांत ४० लाख पौंड किंमतीच्या विविध प्रकारच्या वस्तू बघण्यासाठी ठेवण्यांत आल्या आहेत.

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें
### ३०-९-५२ अखेरच्या वर्षाचा आढावा

दिपवाळी झाल्यानंतर लवकरच साखर करण्याचें काम सुरू करून नेहमीप्रमाणें चांगला नफा मिळेल अशी मॅनेजिंग एजंट यांची अपेक्षा होती. इलेक्ट्रिक केबल्सचा पुरवठा वेळेवर झाला नाहीं त्यामुळें कंपनीला मशिनरी चालू करण्याबाबत विकट परिस्थिति उत्पन्न झाली. सुदैवानें मेसर्स ब्रिटिश इन्सुलेटेड कॅलेंडर्स केबल्स लिमिटेड कंपनी, यांजकडून कंपनीला जरूर त्या केबल्स मिळविता आल्या; पण गळिताचा हंगाम सुरू करण्यास १ फेब्रुवारी, १९५२ पावेतों विलंब लागला. मशिनरीनें नीट काम देण्याकरितां जे फेरफार करावे लागले त्या फेरफारांची चांचणीहि घ्यावी लागली, त्यामुळें कारखान्याचा गळिताचा हंगाम ता. २ ऑगस्ट, १९५२ पर्यंत लांबला. मे, जून, जुलै महिन्यांत गळित करावें लागल्यामुळें साखरेचा उतारा फारच कमी पडला; खर्च मात्र जास्त करावा लागला; व यामुळें अहवालाचे वर्षी घसारा न काढतां रु. ४,५३,५४०-१-३ इतका तोटा झाला आहे.

बाहेरील विकत घेतलेल्या उसासह गाळलेल्या ९७,७३८ टन उसापासून ८६,४९६ पोतीं साखर तयार झाली व तीहि हलक्या प्रतीची होती. मे, जून, जुलै १९५२ मध्यें साखरेच्या उताऱ्याचें प्रमाण ७ पासून ६·५६ टक्के होतें. जर दिपवाळी होतांच तावडतोब उसाचें गळित सुरू झालें असतें तर साखरेच्या सरासरी उताऱ्याचें प्रमाण निदान शेंकडा १०·५ टक्के एवढें पडून, एकूण सुमारें १,००,००० (एक लक्ष) पोतीं साखर, म्हणजे तयार झालेल्या पोत्यांपेक्षा सुमारें १३,६०० पोतीं साखर अधिक तयार झाली असती. खर्चाचें प्रमाण कमी झालें असतें व सरकारी नियंत्रित दराप्रमाणें ११,००,००० (अकरा लक्ष) रुपये कंपनीला जादा मिळाले असते, आणि संचालकांना आपणांस डिव्हिडंड देण्याचें जाहीर करतां आलें असतें.

चालू म्हणजे १९५२-५३ सालीं उसाचें गळित ता. १९-१२-५२ रोजीं सुरू होऊन ता. ३०-४-५३ रोजीं संपलें; यामुळें साखरेचा उतारा सरासरी शेंकडा ११·१ टक्के मिळवतां आला व ८६,९०९ टन उसापासून ९६,०५५ पोतीं साखर तयार करतां आली. नवीन मशिनरीनें दरवर्षी दिपवाळी होतांच तावडतोब उसाचे गळितास सुरुवात करून साखरेचा उतारा व उत्पादन वरीलप्रमाणें मिळेल व झालेला तोटा भरून काढतां येऊन, कारखाना पुन्हां नफ्यांत चालेल, अशी मॅनेजिंग एजन्ट्स् यांची अपेक्षा आहे.

---

स्वातंत्र्याच्या इतिहासाला मदत—भारतीय स्वातंत्र्याच्या आणि त्यानंतर झालेल्या घटनांचा इतिहास लिहिण्यासाठीं मदत म्हणून रॉकफेलर फौंडेशननें इंडिअन कौन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर्स ह्या संस्थेला ४३,८९० डॉलर्स देऊं केले आहेत. श्री. व्ही. पी. मेनन हे सेवानिवृत्त झाल्यापासून ह्या विषयावर एक ग्रंथ लिहीत आहेत.

घराचें अर्थशास्त्र—एडिंबरो येथें ता. १२ ते १८ ऑगस्टपर्यंत होम इकॉनॉमिक्स ह्या विषयासंबंधी एक आंतरराष्ट्रीय परिषद भरविण्यांत येणार आहे. ही परिषद इंग्लंडच्या राणीनें पुरस्कारलेली असून तींत ३५ देश भाग घेणार आहेत. परिषदेचें हें आठवें अधिवेशन आहे.

## शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याची एक दिशा

खेडेगांवांतील आलिकडच्या जीवनाचा विचार केला म्हणजे शेत कऱ्यांच्या परिस्थितीच्या दृष्टीनें मुख्य गरजा म्हणजे पेरणीच्या वेळीं बीबियाणें मिळण्याची तरतूद, जमिनीच्या मशागतीच्या दृष्टीनें चांगल्या खताचा पुरवठा व शेतजमीन चांगल्या रीतीनें माजून काढण्यासाठीं लागणारें साहित्य. आलिकडे महाराष्ट्रांतील जिल्ह्यांत कुळांनीं उत्पन्नाचा एक–षष्ठांश खंड म्हणून जमीन-मालकास द्यावा असा नियम सरकारनें केल्यामुळें शेत कसणारांना वरील पैकी कोणत्याहि गोष्टींसाठी रोख पैसा जमीन-मालकांपासून मिळूं शकत नाहीं. वरील तीन प्रकारच्या गोष्टीं-साठीं शेतकऱ्याला पैसा मिळूं शकेल तर शेतीचें उत्पन्न थोडेंसें वाढावयाला मदत होईल. तरी प्रत्येक खेडेगांवांतून वरील कार्या-साठीं शेतकऱ्याला पैसा मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे. प्रत्यक्ष बीबियाणें पुरविलें गेलें तर जास्त चांगलें. यासाठी गांवांतील तलाठ्यामार्फत शेत कसणारांना बीबियाणें वैयक्तिक पतीवर पुरविण्याची व्यवस्था सरकारनें करावी. यासाठी गांवांतील किंवा आजूबाजूच्या सुस्थितींतील लोकांकडून सरकारनें धान्य पैदा करावें, व हें धान्य पीक हातीं आल्यानंतर ज्यांच्याकडून जमा केलें असेल त्यांना थोड्या जास्त प्रमाणांत परत करावें. या पद्धतीनें सहा महिन्यांच्या मुदतीनें सरकारला ( म्हणजे तला-ठ्याच्या हातीं ) धान्य द्यावयास कांहीं लोक तयार होतील. पंचवार्षिक योजनेची एक जबाबदारी म्हणून सुस्थितींतील लोकांना पेरणीसाठीं वापरावयाला धान्य उसनवार देण्याला प्रवृत्त करावें. समंजस लोक याला तयार होतील असें वाटतें. कारण, मोठाल्या खेडेगांवांतून हल्लीं ग्रामसंस्था स्थापन होत आहेत व त्या थोडेंबहुत कार्यहि करूं लागल्या आहेत. पेरणीसाठी बी–बियाणें म्हणून धान्य अगदीं थोडें पुरतें. रेव्हिन्यू खात्यांतील अधिकारी फिरतीवर जातात व खेडुतांना भेटतात त्यावेळीं या पद्धतीनें तलाठ्याच्या स्वाधीन धान्य करण्यासाठी, या अधि-काऱ्यांनीं प्रचार करावा. अशाप्रकारें सरकारच्या विनंतीला मान्यता देणारे लोक अर्थात् प्रतिष्ठा पावतील. आज प्रत्येक बाबतींत पैशाची उणीव भासते. तेव्हां पैशाची गरज अशा रीतीनें भागविली जाणें शक्य आहे व त्यामुळें खेडेगांवांतील लोकांमध्यें जबाबदारीची जाणीव निर्माण होईल असें वाटतें. कर्जतसारख्या ग्रामीण-विकास-योजनेच्या केंद्रांत हा प्रयोग करणें जास्त सोईस्कर होईल. खतांचा पुरवठा सरकारला स्वतः करतां येईल. कारण, सिंध्रीच्या कारखान्यांत तयार होणारें खत सरकारला स्वतः रेव्हिन्यू खात्यामार्फत शेत करणारांना उधार पुरवितां येईल. यासाठी अर्थात् शेत कसणारांमध्यें जबाबदारी निर्माण झाली पाहिजे व त्यांनीं आपण पतीवर बीबियाणें व खत उसनवार मिळावयास पात्र आहोंत हें दाखविलें पाहिजे. यामुळें चलनविस्ताराला आळा बसून वस्तूंचे भाव मर्यादित रहावयास मदत होईल, असें वाटतें.

---

**बंगालमधील बँकांवर संकट: जनतेची लांच्छनास्पद वृत्ति**

"बंगालमधील कित्येक बँका गेल्या ५–६ वर्षांत बुडाल्या. त्यामुळें जनतेस ३० कोटी रुपयांची ठोकर बसली. बँकांच्या लिक्विडेशनला प्रदीर्घ काळ लागल्यामुळें जी कांहीं जिंदगी होती तीहि संपुष्टांत येऊन बिचाऱ्या ठेवीदारांचें अतोनात नुकसान झालें. ह्यासंबंधांत जनतेचा थंडपणा प. बंगालमधील सार्वजनिक जीव-नाला लांच्छनास्पद आहे" असे उद्गार भारताचे उप–अर्थमंत्री श्री. अरुणचंद्र गुहा ह्यांनीं कलकत्ता येथें काढलें.

SAVE to help yourself and the NATION



WITH THE HOME SAFE

THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
Branches: Dadar, Mahim, Poona & Belgaum.

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

दि
युनायटेड कमर्शिअल बँक लि.
कलकत्ता.

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ | कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ | कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ | कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ७५ | लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :
जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :
बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

### रिझर्व्ह बँकेची बंगलोर शाखा

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया १ जुलै रोजीं बंगलोर येथें शाखा उघडणार आहे. तेथील ट्रेझर्यांचें काम रिझर्व्ह बँक आतां करूं लागेल. कॅनरा म्युच्युअल बिल्डिंगमध्यें रिझर्व्ह बँकेची कचेरी रहाणार आहे.

### पोस्टऑफिसांच्या संख्येंत मोठी वाढ

ग्रामीण विभागांत १९५१–५२ मध्यें ५,००० नवीं पोस्ट-ऑफिसें उघडण्यांत आलीं. ह्यापूर्वी कोणत्याहि एका वर्षांत इतकीं पोस्ट ऑफिसें खोलण्यांत आलीं नव्हतीं. फाळणीनंतरच्या वर्ष-अखेर एकूण पोस्ट ऑफिसांची संख्या २३,३४४ होती, ती ३१ मार्च, १९५२ अखेर ४२,०८४ झाली.

### परराष्ट्रीय व्यापारांत सुधारणा

मार्च १९५२ अखेर संपलेल्या वर्षी भारतानें ५५६ कोटी रुपये किंमतीच्या मालाची निर्गत व ६३२ कोटी रुपये किंमतीच्या मालाची आयात केली. म्हणजे, परराष्ट्रीय व्यापारांत ७६ कोटींची तूट आली. त्यापूर्वीच्या वर्षाचे तत्सम आकडे ७१५ कोटी रु., ८६२ कोटी रु. व १४७ कोटी रु. असे होते. म्हणजे, आयात-निर्गत व्यापार घटला, तरी प्रतिकूल तफावतींत ७१ कोटींची सुधारणा झाली.

### "व्हाइटवे" बंद होणार

व्हाइटवे लेडलॉ आणि कं. लि. ह्या सुप्रसिद्ध दुकानाच्या डायरेक्टर बोर्डानें मुंबईमधील दुकान १५ नोव्हेंबरच्या आंत बंद करण्याचा ठराव केला आहे. इतर शहरांतील शाखा ह्यापूर्वीच बंद करण्यांत आल्या आहेत. कंपनीनें मुंबई शाखेंतील नोकरांना योग्य त्या नोटिसा दिल्या आहेत. दुकान बंद झाल्यामुळें फॅशनेबल व श्रीमंत लोकांची मोठीच गैरसोय होणार आहे.

### एक शष्ठमांश खंडाची नोटिफिकेशन बेकायदा ?

मुंबई सरकारनें १२ डिसेंबर, १९५३ रोजीं एक नोटिफिकेशन काढून कुळांनीं जमीन–मालकांना द्यावयाच्या खंडाचा हिस्सा उत्पन्नाच्या एक शष्ठमांश ठरविला होता. कुमठा येथील एका जमीन–मालकानें ही नोटिफिकेशन गैरकायदा असल्याचा दावा तेथील सिव्हिल कोर्टांत मांडला, व त्यानें एकतृतीयांश उत्पन्नाची मागणी केली. फक्त विधिमंडळासच बॉंबे टेनन्सी कायद्याच्या दुसऱ्या कलमाप्रमाणें कमाल खंड ठरविण्याचा अधिकार आहे ; राज्यसरकारला तो नाहीं, असें सिव्हिल जज्ज श्री. अरवट्टी ह्यांना आढळन आलें असून त्यांनीं मुंबई हायकोर्टाकडे त्याबाबत विचारणा केली आहे.

### साखरेची किंमत योग्य पातळीवर आणणार

गेल्या कांहीं आठवड्यांत साखरेचा बाजारभाव वाढला, तो सयुक्तिक नाहीं असें भारत सरकारचें मत असून, योग्य पातळीवर बाजारभाव आणण्यासाठी सरकारनें त्याची योजना जाहीर केली आहे.

( १ ) मुंबई, कलकत्ता, कानपूर, दिल्ली, ह्यासारख्या महत्त्वाच्या पेठांत खास रेल्वे गाड्यांतून साखर मोठ्या प्रमाणावर पोंचवून, ( २ ) राज्य सरकारांना वाटपासाठी २७ रु. मण दरानें कारखान्यांतून साखर उपलब्ध करून देऊन आणि ( ३ ) जरूर तर साखर आयात करून, व्यापाऱ्यांची साठेबाजी व नफेबाजी हाणून पाडण्याचें सरकारनें ठरविलें आहे.

### देवीच्या रोगावर चित्रपट

युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया स्कूल ऑफ मेडिसिनचे डॉ. सी. हेन्द्री कॅंप ह्यांनीं भारतांत येऊन देवीच्या रोगावर एक रंगीत फिल्म तयार केली आहे.

## CO-OPERATION AND ACCOUNTANCY DIPLOMA BOARD

The undermentioned candidates have been declared by the Co-operation and Accountancy Diploma Board to have passd the Government Diploma in Co-operation and Accountancy Examination held in April 1953, at Poona.

Passed in the whole Examination including those who passed in one or the other part previously.

**I Class**

Deodhar R. R., Patel M. N.

**II Class**

Chaudhary J. R., Khadilkar M. R., Ligade B. B.

**Pass Class**

Annigeri G. V., Dehal N. B., Desai L. M., Dhumal S. Y., Gokhale R. G., Hiremath Chandrashekhar Rachaya., Jorapur B. M., Joshi R. H., Joshi R. R., Joshi S. T., Karadi S. N., Karmarkar A. M., Kulkarni N. D., Kulkarni P. V., Lokhande G. S., Pandya D. C., Pangal S. T., Patel J. L., Patel M. H., Raje K. D., Shah C. A., Shende R. P., Shikarpur Venkatasubba Rao., Sovani G. V., Tinaikar V. S., Trivedi G. J., Trivedi K. H., Tuppad J. T., Athanikar M. L., Bhat Venkatraman Rama., Bokil G. K., Dixit R. J., Inamdar B. H., Mukhedkar M. S., Mutalik-Desai B. K., Naik N. K., Pandya P. G., Pathak D. P., Patil Balgauda Bhimgauda., Rahator S. H., Sali S. V., Sane C. G., Shaikh F. M., Shukla R. V., Thosar Y. S., Parekh C. H.

**Passed in 'Co-operation' Group only**

Koteshwar N. K., Patel C. G., Pradhan R. R., Bhende S. S., Deshpande V. R., Gadkari K. R., Gokhale H. V., Heblikar N. L., Jawadekar S. M., Kanade N. K., Kulkarni N. S., Modi M. B., Mohite D. S., Nathwad R. B., Naik B. V., Naik D. D. Patel M. P., Raichur S. S., Rana B. T., Sonavane T. M., Tejwani S. L., Tilak N. B.

**Passed in 'Accountancy' Group only**

Chavan D. H., Choksi S. N., Almoula M. M., Barot R. H., Barve A. K., Chavan V. A., Deshpande R. D., *Shrimati Dixit, Nirmala Laxman*, Gaikwad V. V., Gore M. G., Gujar G. P., Hattikudur M. J., Havanur H. M., Jaini R. B., Jawale P. N., Joglekar P. R., Joshi J. K., Khamkar B. V., Kole B. B., Kurulkar V. R., Mangela R. D., Managoli Y. K., Manglani B. L., Misal B.S., Modi F. K., Parikh B.C., Patil R. S., Patil S. B.,* (*Shamrao Banduji), Patil S. B, Patil S. T., Patki V. Y., Patted V. M., Pawar F. D., Phatak B. V., Sadari S. G., Shah N. B., Shalia I. T., Shringarpure K. R., Sondur B. R., Tamanekar M. V., Tandale N. T., Taylor K. D., Utpat K. D., Vasavda S. M.

**P. J. Chinmulgund,**
Registrar of Co-operative Societies,
Bombay State, Poona, and Chairman
Co-operation & Accountancy Diploma Board,
Poona.

### ताडगूळ-कामगारांची परिषद

अ. भारतीय ताडगूळ कामगारांची परिषद तुतिकोरीन येथें गेल्या १० तारखेस भरली होती. ताडगूळ तयार करण्याचा धंदा मद्रास राज्यांत सर्वांत अधिक विकास पावलेला असून तो सहकारी संस्थांच्या मार्फत चालतो. दारूबंदी सुरू होईपर्यंत धंदा कसाबसा चालला होता. परंतु दारूबंदी सुरू झाल्यानंतर ताडी-कामगारांना ह्या धंद्याच्या रूपानें एक नवाच व्यवसाय मिळाल्यासारखा झाला. मद्रास राज्यांत १९५२ सालीं ताडीपासून गूळ करणारे २,००० सहकारी कारखाने होते. सर्व संस्थांची मिळून सभासदांची संख्या १,५०,००० होती आणि त्या दरवर्षी सुमारें २,५०,००० मण ताडगूळ तयार करीत असत. ह्या गुळाची किंमत अंदाजें ७८,०१,००० रुपये होत असे. राज्य-सरकारनें गुळाच्या उत्पादनांत वाढ करण्यास आणि त्याचा दर्जा सुधारण्यास मदत केली आहे. ताडगूळ कसा तयार करावा ह्यासंबंधीचे शिक्षण कांहीं कार्यकर्त्यांना मुद्दाम देण्यांत देत असून ते नंतर घरोघरीं जाऊन कामगाराला व्यवसायाचें शिक्षण देतील. बऱ्याच कामगारांना ताडगूळ तयार करण्याची सुधारलेली सामुग्री विनामूल्य देण्यांत आली असून नवीन प्रकारच्या भट्ट्या वापरण्याचेंहि त्यांना शिकविण्यांत येत आहे. ह्या भट्ट्यांमुळें जळणाच्या खर्चांत बरीच बचत होते. गेल्या वर्षी ६०० शिक्षण-केंद्रांतून ४,६०० कामगारांना ताडीचा गूळ करण्याचें शिक्षण देण्यांत आलें. तिरूनेवेल्ली जिल्ह्याच्या किनाऱ्याच्या भागांत तर ताडीपासून साखरहि तयार करण्यांत येते. तथापि, एकंदरीनें ताडगुळाचा धंदा अजूनहि मागासलेलाच आहे. गांवकऱ्यांचीं अपुरीं साधनें, शास्त्रीय युक्त्याविषयीं अज्ञान आणि परिस्थितीला अनुरूप असे व्यावसायिक फेरफार करण्याची अनिच्छा, इत्यादि कारणांमुळें धंदा मागासलेल्या स्वरूपांत राहिला आहे.

### दुसरा सहकारी साखर कारखाना

नगर जिल्ह्याच्या कोपरगांव तालुक्यांतील शेतकऱ्यांनीं स्वतःच्या पायावर सहकारी तत्त्वावर साखर कारखाना काढण्याचे बरेच दिवसांपासून प्रयत्न चालविले होते व त्यासाठी सहकारी मान्यतेसाठी प्रकरणाहि पाठविलें होतें. या प्रयत्नांस यश येऊन मुंबई राज्याचे सहकारी सोसायट्यांचे रजिस्ट्रारसाहेब यांनीं सदर कारखाना सहकारी कायद्याखालीं नोंदल्याबद्दल प्रवर्तकांकडे कळविलें आहे. हा सहकारी साखर कारखाना रजिस्टर होण्यासाठी कोपरगांव तालुक्यांतील शेतकऱ्यांनीं प्राथमिक शेअर-भांडवल सुमारें सात लाख रुपये जमविलें आहे. कोपरगांव तालुक्यांतील सहकारी चळवळीचे कार्यकर्ते श्री. गणपतराव रमाजी औताडे पाटील हे कारखान्याचे मुख्य प्रवर्तक आहेत. या सहकारी साखर कारखान्याची पहिली वार्षिक जनरल मीटिंग लौकरच या महिनाअखेर होणार असल्याचें समजतें.


—: महाराष्ट्राची अग्रेसर कंपनी :—

दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कंपनी लि.

पहिल्याच मूल्यमापनांत बोनस जाहीर करून, कंपनीनें असाधारण विक्रम करून दाखविला आहे. दुसऱ्या मूल्यमापनाचें काम चालू झालें असून, त्यांत निश्चित प्रगति दिसेल अशी खात्री वाटते.


६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १. — शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर

किर्लोस्कर



हातपंप

उन्हाळी पिकासाठीं व घरगुती पाणी पुरवठ्यासाठीं खात्रीची उपाय योजना.



सेंट्रिफ्युगल पंप

विशेष माहितीसाठीं लिहा.

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी द. सातारा

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,१९,४८५ |
| खेळतें भांडवल | रु. ७५,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.